# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, गुरुवार, दिनांक १ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३०९ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

## बंडोबा थंड होणार का?

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षात मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. भाजपपासून ते काँग्रेसपर्यंत ही बंडखोरी दिसून येत आहे. सात वर्षानंतर ही निवडणूक होत आहे. यापूर्वी या ना त्या कारणामुळे निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्यात येत होती. शेवटी न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. न्यायालयाच्या दंडुक्यामुळे प्रशासनाला कुठल्याही परिस्थितीत जानेवारीच्या अखेरपर्यंत ही निवडणूक घ्यायची आहे. प्रत्येक वेळी निवडणुकीची घोषणा होणार याची चर्चा होत असल्याने सर्वच पक्षातील कार्यकर्ते गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होते. परंतु, प्रत्येकवेळी त्यांचा हिरमोड होत असे. आता प्रशासनाने निवडणूक जाहीर केली आणि सर्वच पक्ष कामाला लागले. दोन दिवसांपूर्वी उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही त्यांनी बंडखोरी करीत आपले अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे अधिकृत उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. आता या बंडोबांची समजूत काढण्यासाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. परंतु, बंडखोरांनीही अडेलपणाची भूमिका घेतली आहे. इतकी वर्षे आम्ही काय केले अशी विचारणा बंडखोर आपल्या नेत्यांना करीत आहेत. नेतेही निरूत्तर झाले आहेत. बंडखोरांची कशी समजूत काढायची असा प्रश्न नेत्यांना पडला आहे. बंडखोरांनी देखील अभी नही तो कभी नही अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे नेतेही नेते पेचात पडले आहेत. भाजपमध्ये बंडखोरांना समजावण्यात कदाचित यश येईल. परंतु, काँग्रेसचे काय? असा प्रश्न उभा ठाकला आहे.

# भाजपच्या निष्ठावंताचे राजीनामे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, ३१ डिसेंबर**

महापालिका निवडणुकीत भाजपचे निष्ठावान नेते आणि कार्यकर्त्यांना डावलून पक्षात आलेल्या आयारामांना उमेदवारी दिल्यामुळे नाराज झालेल्या भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. दुसरीकडे पक्षात अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना काँग्रेसने उमेदवारी नाकारल्याने या कार्यकर्त्यांनी आमदार विकास ठाकरे यांच्या नावाने शिमगा केला आहे.

भाजप शिस्तीचा पक्ष म्हणून ओळखल्या जातो. अनेक नेते आणि कार्यकर्ते निष्ठेने कार्य करीत असतात. कधी ना कधी आपल्याला पदे मिळतील या आशेने कार्यकर्ते राबराब राबत असतात. परंतु, मागील काही दिवसांपासून भाजपने मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू केली आहे. दुसऱ्या पक्षातील नेत्यांना आपल्याकडे ओढण्यात भाजप व्यस्त आहे. त्यामुळे पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे. माजी महापौर अर्चना डेहनकर या दोनदा निवडून आल्या. एकदा त्यांना महापौरपदी संधी दिली. यंदाही त्यांना उमेदवारी मिळेल असे त्यांना वाटत होते. मात्र, ऐनवेळी पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारली. त्यामुळे अर्चना डेहनकर आणि त्यांचे कार्यकर्ते संतप्त झाले. पक्षातील निष्ठावानांना डावलून कालपरवा भाजपात आलेल्या नेत्यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. या निषेधार्थ अर्चना डेहनकर, विनायक डेहनकर आणि शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. घरी बसेन पण, भाजप उमेदवारांचा प्रचार करणार नाही अशी भूमिका डेहनकर यांनी घेतली आहे.

पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनीही त्यांचा मुलगा रोहीत खोपडे याच्या उमेदवारीसाठी खूप प्रयत्न केले. त्यांना आश्वासन देखील देण्यात आले होते. मात्र, ऐनवेळी रोहीतला उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे रोहीतने देखील आपल्या कार्यकर्त्यांसह राजीनामा दिला आहे. अशीच स्थिती संपूर्ण शहरात आहे. उमेदवारी न मिळालेल्या काही कार्यकर्त्यांनी बंडखोरी करीत निवडणुकीच्या मैदानात दंड थोपटले आहे.

### काँग्रेसच्या आ. ठाकरे विरोधात शिमगा



**आ. ठाकरेंच्या नावे शिमगा**

तिकडे काँग्रेसमध्ये आमदार विकास ठाकरे यांनी आपल्याच मर्जीतील उमेदवारांना कार्यकर्त्यांना उमेदवारी दिल्याचा आरोप करीत कार्यकर्त्यांनी ठाकरेंच्या नावाने बोंबा मारून शिमगा साजरा केला. काही कार्यकर्त्यांनी पैसे घेऊन एबी फॉर्म दिल्याचा आरोप केला आहे. ज्या कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्यात आली नाही त्या कार्यकर्त्यांनी कालच आमदार ठाकरे यांच्या घरी धडक दिली. ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता कार्यकर्त्यांनी निम का पत्ता कडवा है, विकास ठाकरे... अशा घोषणा देत शिमगा साजरा केला. काँग्रेसने अनेक माजी नक्षरसेवक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारी नाकारल्याने ही स्थिती निर्माण झाल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

### ठाकरे सेनेने तिकीटा विकल्याचा आरोप

उबाठाचे माजी उपमहापौर किशोर कुमेरिया यांनी पैसे घेऊन तिकीटा दिल्याचा आरोप त्यांच्या पक्षातील नेते नितीन तिवारी यांनी केला आहे. कुमेरिया आणि तिवारी हे दोघेही एकाच प्रभागातून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. मागील निवडणुकीत कुमेरिया यांनी ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढविली होती. त्यात ते विजयी झाले होते. यंदाही ते ओबीसी प्रवर्गातून आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील असे तिवारी समर्थकांना वाटत होते. मात्र, ऐनवेळी कुमेरिया यांनी ओबीसी प्रवर्गातून दुसऱ्याला उमेदवारी देत स्वत: सर्वसाधारण प्रवर्गातून आपला अर्ज भरला. त्यामुळे तिवारी यांची गोची झाली. एबी फॉर्म असुनदेखील उमेदवारी अर्ज भरता न आल्याने तिवारी आणि त्यांच्या समर्थकांनी नाराजी व्यक्त करीत लवकरच पक्षाला जय महाराष्ट्र करण्याचा इशारा दिला आहे.

# मुंबईचा महापौर उत्तर भारतीयच होणार!

### भाजप नेत्याच्या वक्तव्यानं राजकारण तापलं



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना, राजकीय वातावरण चांगलंच तापू लागलं आहे. १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला निकाल लागणार असतानाच महापौरपदावरून आरोपप्रत्यारोपांची धार तीव्र झाली आहे. अशातच भाजप नेते यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे मुंबईच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

महापौर पदावर दावा करताना कृपाशंकर सिंह यांनी "मुंबईचा महापौर उत्तर भारतीयच होणार" असं विधान केलं आणि तेव्हापासून राजकीय वादाला तोंड फुटलं आहे. या विधानानंतर चौफेर टीकेच्या भोवऱ्यात सापडला असून, मराठी अस्मितेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

माध्यमांशी बोलताना कृपाशंकर सिंह म्हणाले, "मिराभाईंदरसह राज्यातील २९ महापालिकांमध्ये महायुतीची सत्ता येईल. मुंबईत इतके नगरसेवक निवडून आणू की उत्तर भारतीय समाजाचा महापौर बसेल."

या वक्तव्यातील आत्मविश्वास आणि थेट आव्हानात्मक सूर पाहता, हे विधान चुकीचं घसरलेलं पाऊल आहे की जाणीवपूर्वक टाकलेला राजकीय दाव आहे, यावर चर्चा सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे, हे वक्तव्य अशा वेळी आलं आहे की नुकतीच आणि यांची युती जाहीर झाली आहे. मराठी माणूस आणि मुंबईची अस्मिता हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून ठाकरे बंधू एकत्र आले असताना, भाजप नेत्याचं हे विधान राजकीय आग भडकवणारं ठरत आहे.

# डॉ. पाखमोडे यांचे निधन



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३१**

शहरातील प्रख्यात न्युरोसर्जन आणि धंतोली येथील न्युरॉन हॉस्पिटलचे संचालक डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे बुधवारी सकाळी हृदयविकाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ५० वर्षांचे होते. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

बुधवारी सकाळी पाचच्या सुमारास डॉ. पाखमोडे हे हॉस्पिटलमध्ये असताना त्यांना हृदयविकाराचा त्रास सुरू झाला. त्यांना तात्काळा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. त्यांना वाचविण्यासाठी डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, नियतीला वेगळेच मान्य होते आणि अखेर सकाळी ८ च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.

मुळचे सेलोटी, लाखनी (जि. भंडारा) येथे डॉ. पाखमोडे यांचा जन्म झाला. डॉ. पाखमोडे हे केवळ एक कुशल आणि विद्वान डॉक्टर नव्हते, तर रूग्णांप्रती करूणा, समर्पण आणि संवेदनशीलतेने परिपूर्ण असलेले एक महान व्यक्ती होते. हजारो रूग्णांना त्यांनी नवजीवन दिले. पाखमोडे यांची गणना राज्यातील उत्तम शल्यचिकित्सकांमध्ये केली जात असे. मागील २५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी वैद्यकीय सेवा दिली. शांत, संयमी आणि रूग्णांशी आपुलकीने वागणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. कठीण प्रसंगातही रूग्णांना धीर देण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे ते रूग्णप्रिय डॉक्टर होते.

### नितीन गडकरी यांना दु:ख

डॉ. पाखमोडे यांच्या निधनावर केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. एक अभ्यासू तज्ज्ञ आणि रूग्णांविषयी कळवळा असलेला संवेदनशील डॉक्टर आपण गमावला आहे या शब्दात गडकरी यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या.

# शिंदे समितीला पुन्हा मुदतवाढ

**मुंबई, दि. ३१**

मराठा समाजाला मराठा -कुणबी, कुणबी -मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी करून प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती विहित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीला पुन्हा सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य सरकारने यापूर्वी शिंदे समितीला दिलेली मुदत आज, ३१ डिसेंबर २०२५ संपुष्टात आली.

# नवीन वर्षाचे उत्साहात स्वागत




**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३१**

मावळत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचे शहरवासियांनी जोरदार स्वागत केले. रात्री बाराच्या ठोक्याला सर्वत्र फटाक्यांची आतिशबाजी करीत नववर्षाचे स्वागत केले. यावेळी संपूर्ण शहरात पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला होता.

रात्री दहा वाजेपासूनच तरुणाई नवीन वर्षाच्या स्वागतासाठी रस्त्यावर उतरली होती. गोकुळपेठ, लॉ कॉलेज चौक, अंबाझरी, फुटाळा, शंकरनगर चौक, प्रतापनगर चौक, सीताबर्डी, सदर परिसरात तरुणाईंनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. हॅप्पी न्यू ईयरच्या बोंबा मारत तरुणाई दुचाकीने इकडून तिकडे फिरत होते. त्यात तरुणींचा देखील सहभाग होता. गोकुळपेठ, लॉ कॉलेज चौक, शंकरनगर चौकात रस्त्यावर इतकी गर्दी झाली की, पोलिसांना गर्दी आवरत नव्हती. रात्री बाराचा ठोका होताच रस्त्यावरील तरुण, तरुणींनी हॅप्पी न्यू ईयरच्या तालावर ठेका देत नववर्षाचे स्वागत केले. काहींनी रस्त्यावरच फटाके फोडून मावळत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत केले. रात्री १२.३० वाजेपर्यंत तरुणाईचा हा धिंगाणा सुरू होता.

रस्त्यावर पोलिस

दरवर्षीचा अनुभव लक्षात घेता संपूर्ण शहरात पोलिसांचा कडक पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. गोकुळपेठ, लॉ कॉलेज चौक, अंबाझरी, शंकरनगर चौकात स्थानिक पोलिसांसोबत मुख्यालयातील पोलिस तैनात करण्यात आले होते. अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिसांनी जागोजागी लोखंडी कठडे उभारून गर्दी कमी करण्याचा प्रयत्न केला होता.

**तळीरामांची धरपडक**

तळीरामांच्या बंदोबस्तासाठी संपूर्ण शहरात नाकाबंदी लावण्यात आली होती. रस्त्याने येजा करणारे प्रत्येक दुचाकीस्वार, कारचालक, ऑटोचालक यांची ब्रिथ एनॉलायझरच्या मदतीने तपासणी करण्यात येत असे. चौकाचौकात नाकाबंदी लावल्याने वाहनचालक त्रस्त झाले होते. रात्री उशीरापर्यंत ही नाकाबंदी सुरू होती असे शहर नियंत्रण कक्षाने सांगितले.























# कॅलिडोस्कोप

## अंड्याची विक्रमी किंमत!



एका अंड्याची किंमत किती असू शकते? ७ रुपये, १० रुपये किंवा जास्तीत जास्त २५ रुपये; पण एका अंड्याची किंमत चक्क ३०.२ दशलक्ष डॉलर आहे. इतक्या पैशात शंभरहून अधिक हेलिकॉप्टर्स सहज खरेदी करता येतील.

एका अनोख्या लिलावात एका अंड्याने नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. ते प्रसिद्ध रशियन ज्वेलरी फॅबर्गे यांनी तयार केले होते आणि ते त्यांच्या कलात्मकतेचे एक अद्वितीय उदाहरण आहे. बर्फाच्या वितळणाऱ्या तुकड्यासारखे दिसणारे हे अंडे क्रिस्टलपासून बनलेले आहे. त्यावर सुमारे ४,५०० लहान हिरे जडवलेले आहेत. शिवाय, अंड्याच्या आत फुलांनी भरलेली टोपली ठेवली आहे. एकूणच, या 'क्रिस्टल फॅबर्गे एग'ची कारागिरी इतकी उत्कृष्ट आहे की ती लोकांना मोहित करते. या अंड्याचा इतिहास एखाद्या चित्रपटाच्या पटकथेपेक्षा कमी नाही. हे अंडे रशियाचे झार निकोलस द्वितीय यांनी १९१३ मध्ये ईस्टरला त्यांची आई, महाराणी मारिया फेडोरोव्हना यांना भेट म्हणून दिले होते. ते केवळ कलाकृती नव्हते, तर राजघराण्याच्या ऐश्वर्याचे प्रतीक होते.

ते रशियन क्रांतीमध्ये संपले. असे म्हटले जाते, की हे अंडे झारच्या राजवटीच्या समाप्तीनंतर गायब झाले होते, परंतु ते १९९० च्या दशकात पुन्हा दिसू लागले. तेव्हापासून, ते प्रत्येक वेळी विकले गेले आहे, यापूर्वीच्या सर्व लिलावांमध्ये या अंड्याने सर्व विक्रम मोडले आहेत. आता ३०.२ दशलक्ष डॉलर्सची बोली जिंकून या अंड्याने कला आणि इतिहास संपत्तीपेक्षा जास्त मौल्यवान आहेत हे सिद्ध केले आहे.

## तब्बल १६ मजली स्थानक !



भारतातील बहुतेक रेल्वे स्थानके एक किंवा दोन मजली आहेत, परंतु सध्या एक तब्बल१६ मजली स्थानक तयार होत आहे. हे रेल्वे स्थानक २०२७ पर्यंत पूर्ण होईल.

हे रेल्वे स्थानक अहमदाबादमध्ये बांधले जात आहे. देशातील सर्वात उंच आणि आधुनिक १६ मजली बहु–मॉडेल वाहतूक केंद्र म्हणून, हे रेल्वे स्थानक जुलै २०२७ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्याची उंची, डिझाइन आणि सुविधांमुळे या रेल्वे स्थानकाची चांगलीच चर्चा आहे. या १६ मजली हबमध्ये विस्तृत पार्किंग जागा, ऑफिस कॉम्प्लेक्स, व्यावसायिक क्षेत्रे आणि प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधांचा समावेश असेल.

नवीन स्थानकाची उंची, डिझाइन आणि सुविधांसह हे पूर्णपणे वेगळे आणि आधुनिक स्वरूपाचे असेल. हे केवळ एक रेल्वे स्थानकच नाही, तर प्रवासी, पर्यटक आणि शहरातील रहिवाशांसाठी एक बहुउद्देशीय सुविधा केंद्र असेल. रेल्वे, मेट्रो, बस आणि बुलेट ट्रेन सेवा एकाच प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित करण्यासाठी हे स्थानक डिझाइन केले जात आहे. प्रवाशांना एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व कनेक्टिव्हिटीचा आनंद घेता येईल. त्यामुळे प्रवास अत्यंत सोयीस्कर होईल.

या स्थानकाच्या डिझाइनमध्ये शहराच्या प्राचीन वारशाचा टच देण्यात आला आहे. बाह्य आणि अंतर्गत वास्तुकला वारशाचे सुंदर मिश्रण येथे पाहायला मिळेल. यात अहमदाबादची ऐतिहासिक ओळख जपली जाईल आणि आधुनिकतेचे मिश्रणही असेल. येत्या काळात वाढत्या प्रवाशांच्या वाहतुकीला लीलया हाताळण्यासाठी हे स्थानक डिझाइन केले जात आहे. शहराच्या विविध वाहतूक नेटवर्कशी थेट आणि अखंड कनेक्टिव्हिटी हे या प्रकल्पाचे प्रमुख आकर्षण आहे. रेल्वे अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार स्टेशनच्या आजूबाजूचा परिसरदेखील विकसित केला जाईल.

सुधारित रस्ते, बस कनेक्शन, मेट्रो लिंक आणि भविष्यातील बुलेट ट्रेन कॉरिडॉरमुळे, संपूर्ण परिसर अहमदाबादचे नवीन वाहतूक केंद्र म्हणून उदयास येईल. या प्रकल्पामुळे शहराचा आर्थिक विकास होऊन व्यापार आणि पर्यटनालाही चालना मिळेल.

## मंदिर उघडतं १२ तासांसाठी



भारतात अनेक मंदिरं आहेत. बऱ्याच मंदिरांमध्ये अनोख्या परंपरा पहायला मिळतात. काही मंदिरं वर्षातून एकदाच उघडतात. तर काही मंदिरांमध्ये वेगळ्या पद्धतीचा नैवेद्य दाखवला जातो. काही मंदिरं चित्रविचित्र नवस बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. छत्तीसगडमधल्या कोंडागाव जिल्ह्यात असंच एक मंदिर आहे. लिंगेश्वरी मातेचं हे मंदिर आहे. छत्तीसगडमध्ये या मंदिराचं मोठं महत्त्व आहे. पण इतर राज्यातल्या लोकांना याबाबत फारशी माहिती नाही. हे मंदिर वर्षातून फक्त एकदाच उघडतं आणि तेही फक्त बारा तासांसाठी.यावेळी इथे भाविकांनी मोठी गर्दी झालेली असते. छत्तीसगडमधला हा जिल्हा नक्षल प्रभावित आहे. त्यामुळे इतर भागातले लोक या ठिकाणी फारसे येत नाहीत. हिरव्यागार जंगलाच्या मधोमध अलोर नावाचं छोटंसं गाव आहे. या गावातल्या डोंगरांवर निसर्गाची एक कलाकृती पहायला मिळते. याच कलाकृतीच्या दारावर एक दगड आहे. हा दगड हटवल्यानंतरच मंदिरात प्रवेश करता येतो. या मंदिरात शंकर आणि पार्वतीच्या एकत्र रूपाला लिंगेश्वरी नावाने संबोधलं जातं. या मंदिरातल्या देवतेला काकडीचा नैवेद्य दाखवला की नवस पूर्ण होतो अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. त्यामुळे मंदिराच्या आसपास काकडी मोठ्या प्रमणावर विकली जाते. लिंगेश्वरी देवतेला काकडी अर्पण केली की अपत्यप्राप्ती होते असंही मानलं जातं. फक्त एकच दिवस मंदिर उघडत असल्याने लोकं रांगत रांगत दर्शनासाठी जातात.


## ते प्लास्टिक खाणारे

प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत जनजागृती होत असते. अनेक ठिकाणी प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक वस्तूंवर बंदी येते. प्लास्टिकचं विघटन वर्षानुवर्षं होत नाही. त्यामुळे ते पर्यावरणाला हानिकारक असतं. पण आता एक किडा प्लास्टिक खाऊन पर्यावरणाचं रक्षण करू शकतो. मधमाशीचं पोळं खाणारा एक किटक प्लास्टिकही खाऊ शकतो असं केंब्रिज विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हा किटक मधमाशीचं पोळं पचवू शकतो. त्याचप्रमाणे तो प्लास्टिकही पचवू शकतो, असं संशोधनातून समोर आलं आहे. 'गॅलेरिया मेलोनेला' असं या किटकाचं नाव आहे. हा किटक एखाद्या अळीसारखा दिसतो. हा किडा तासाभरात प्लास्टिकची पिशवी खाऊ शकतो. केंब्रिज विद्यापीठातले डॉक्टर पाओलो बॉम्बेली या संशोधनाचे प्रमुख आहे.



हा किडा प्लास्टिक कसा खातो हे समजून घेणं गरजेचं आहे असं ते सांगतात. या किड्याचं तंत्र जाणून घेतलं तर प्लास्टिक नष्ट करण्याचं तंत्रज्ञान आपण निर्माण करू शकू. यामुळे प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाचं आव्हानाला सामोरं जाता येईल, असं त्यांचं म्हणणं आहे. या छोट्याशा किड्यांची प्लास्टिक खाण्याची क्षमता अनोखीच म्हटली पाहिजे.

## रंगीबेरंगी नदी



आकाशात इंद्रधनुष्याचे सुंदर रंग दिसतात. सरडा परिस्थितीनुसार रंग बदलतो. निसर्गात असे बरेच चमत्कार पहायला मिळतात. आजवर आपण विविध नद्यांबद्दल ऐकलं आहे. काही नद्या लुप्त झाल्या आहेत. तर काही अचानक प्रगट झाल्या आहेत. काही नद्यांनी आपले मार्गही बदलले आहेत. पण शेजारच्या फोटोत दिसणारी नदी अनेक अर्थांनी वेगळी आहे. 'कॅनो क्रिस्टल्स' असं या नदीचं नाव आहे. कोलंबिया नावाच्या देशात ही नदी आहे. ही नदी ऋतूनुसार आपला रंग बदलते. हो, हे खरं आहे. ही नदी १०० किलोमीटर लांब आहे. तर तिची रुंदी जवळपास २० मीटर आहे. या नदीला 'लिक्विड रेन्बो' असंही म्हटलं जातं. कधी या नदीच्या पाण्याचा रंग लाल असतो. तर कधी पिवळा होऊन जातो. कधी तो हिरवा झालेला असतो. ही नदी रंग का बरं बदलत असेल? या प्रश्नाचं उत्तर एका रोपट्यात दडलं आहे. या नदीत 'मॅकारेनिया क्वॅवीगॅरा' नावाचं रोपटं आढळतं. या रोपट्यामुळेच नदीचा रंग बदलत राहतो. या रोपट्याला पुरेसं पाणी किंवा सूर्यप्रकाश मिळाला तर त्याचा रंग गडद लाल किंवा सौम्य होतो. वर्षातला बराच काळ या नदीचा रंग फिका किंवा गडद गुलाबी वा फिका किंवा गडद लाल असतो. पण काही वेळा पाण्याचा रंग पिवळा, हिरवा, नारिंगी किंवा निळाही होतो. जून ते नोव्हेंबर या काळात ही नदी रंग बदलते. निसर्गाचा हा अद्भुत कलाविष्कार पाहण्यासाठी इथे पर्यटकांची झुंबड उडालेली असते. पण निसर्गाच्या रक्षणासाठी काही नियमही बनवण्यात आले आहेत. एका दिवसात २०० पेक्षा जास्त लोकांना या प्रदेशात जाता येत नाही.

## स्टेशनचे नाव की मारूतीचे शेपूट?

भारतात अनेक वैशिष्ट्यपूर्ण रेल्वे स्थानके आहेत. भव्यतः गर्दी, लांबी, रुंदी तसेच विविध कारणांमुळे ही रेल्वे स्थानके प्रसिद्ध झाली आहेत, तर काही रेल्वे स्थानके त्यांच्या इतिहासासाठी जगभरात प्रसिद्ध आहेत. भारतातील असेच एक रेल्वे स्थानक त्याच्या नावामुळे प्रसिद्ध आहे. सर्वात मोठ नाव असलेले भारतातील एकमेव रेल्वे स्टेशन आहे. या स्टेशनचे नाव वाचता वाचता ट्रेन निघून जाईल

भारतीय रेल्वे दररोज लाखो प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचवते. भारतीय रेल्वे हे जगातील चौथ्या क्रमाकांचे सर्वात मोठे रेल्वे नेटवर्क आहे. भारतातील जुन्या रेल्वे स्थानकांमध्ये प्रतीक्षा कक्षांचा विस्तार केला जात आहे आणि नवीन स्थानके बांधली जात आहेत. हा विस्तार केवळ जुन्या रेल्वे स्थानकांमध्येच नाही, तर त्यांच्या नावांमध्येही दिसून येतो. भारतातील एका रेल्वे स्थानकाच्या नावात एक किंवा दोन नाही, तर तब्बल २८ अक्षरे आहेत. काही स्थानकांना प्राण्यांची नावे दिली जातात, तर काहींची नावे व्यक्तींची नावे आहेत. भारतात अशा प्रकारच्या अद्वितीय नावांची रेल्वे स्थानके भरपूर आहेत. या स्टेशनचे नाव 'वेंकटनरसिंहराजुवरीपेटा' असे आहे. तामिळनाडूच्या सीमेवर असलेल्या या स्टेशनला व्हीकेझेड कोड आहे. हे रेल्वे स्टेशन दक्षिण रेल्वेच्या अरक्कोनम शाखा मार्गावर आहे.




५७ अक्षरांचे नाव असलेले स्टेशन

जगात एक रेल्वे स्टेशन आहे ज्याच्या नावात ५७ अक्षरे आहेत. त्या स्टेशनला 'Llanfairpwll gwyngyllgogerych wyrndrobwllllantysili ogogogoch' असे म्हणतात. हे एक लहान, शांत गाव असून ते ब्रिटनमधील नॉर्थ वेल्समधील अँगलसी बेटावर आहे. या स्टेशनला सामान्यतः ड्श्ररपषरळीिश्रि असेही म्हणतात.

## ...म्हणून इथे येतात चिनी नागरिक



एखाद्या देशात फिरायला गेल्यावर आपण तिथे वाहन चालवण्याचा परवाना मिळवण्यात वेळ घालवणार नाही. पण दक्षिण कोरियातल्या जेजू बेटांची गोष्टच निराळी आहे. जेजू हे बेट पर्यटकांसाठी जणू स्वर्गच आहे. निसर्गसौंदर्याने नटलेलं हे ठिकाण पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत आलं आहे. ज्वालामुखीच्या स्फोटातून या बेटाची निर्मिती झाली आहे. हे बेट कोरियाच्या दक्षिण–पश्चिम भागापासून १०० मैल अंतरावर आहे. जेजूमध्ये चीनी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. या वर्षी जवळपास ३ लाख चीनी पर्यटक जेजूमध्ये येऊन गेले आहेत. जेजूचे समुद्र किनारे चीनी पर्यटकांना खूप आवडतात. तसंच खरेदी आणि जुगार खेळण्यालाही त्यांची पसंती असते. यासोबत इथला वाहन चालवण्याचा परवाना मिळवण्यासाठीही ते उत्सुक असतात. इथल्या वाहन परवान्याची परीक्षा देण्यासाठी अनेक जण चीनमधून जेजूमध्ये येतात. एक अख्खा दिवस वाहन परवाना मिळवण्यासाठी घालवतात. हे लोक इथे येतात. फॉर्म भरतात. दिवसभर रांगेत उभे राहतात आणि परीक्षा देतात. या वर्षी २१७२ चीनी नागरिकांना वाहन चालवण्याचा परवाना देण्यात आला आहे. चीनमधल्या महानगरांमध्ये वाहन परवाना बनवून घेण्यासाठी प्रचंड खर्च येतो. त्यापेक्षा कमी खर्चात लोक जेजूला येऊ शकतात. तसंच इथे अगदी झटपट परवाना मिळून जातो. चीनमधल्या टूरिस्ट कंपन्या दक्षिण कोरियात परवाना बनवून घेण्यासाठी पाच दिवसांची टूर आयोजित करतात. यासाठी पॅकेजही ठरलेली आहेत. चीनमध्येही इतर देशांमधून मिळालेला वाहन परवाना वैध असतो. जेजूमधून परवाना घेऊन आलेल्या नागरिकांना चीनमध्ये फक्त लेखी परीक्षा द्यावी लागते. जेजूमध्ये यायला चीनी लोकांना व्हिसा लागत नाही. त्यामुळे परवाना बनवून घेण्यासाठी या बेटावर चीनी नागरिक मोठी गर्दी करतात.

## खातेधारकाचे अजब नाव

सरकारी बँकांत येणारे बरेच लोक फारसे शिक्षित नसतात. परिणामी, ते स्वतः बँकिंग कामे करू शकत नाहीत किंवा चुकीची माहिती भरतात. एका महिलेने स्टेट बँकेच्या डिपॉझिट स्लिपवर लिहीलेले पाहून बँक व्यवस्थापकालाही धक्का बसला. व्हायरल डिपॉझिट स्लिप पाहून 'सोशल मीडिया' वापरकर्ते हसू आवरू शकले नाहीत.

ही डिपॉझिट स्लिप अलीकडेच सोशल मीडियावर एका अकाउंटवरून शेअर करण्यात आली आहे आणि नेटिझन्स त्यावर विविध प्रकारे कमेंट करत आहेत. महिलेने भरलेल्या या डिपॉझिट फॉर्ममध्ये खातेधारकाच्या नावाऐवजी 'सोनूची आई' असे लिहिले आहे. दरम्यान, रक्कम आणि एकूण रक्कम वाचून प्रत्येकजण हसून हसून लोळत आहे. रोख/चेक स्टेटमेंटमध्ये महिलेने 'सोनूच्या शिक्षणासाठी पैसे जमा करावे लागतील.', असे लिहिले आहे. रकमेच्या कॉलममध्ये 'कन्या' लिहिले आहे. एकूण रकमेऐवजी, तिने 'राजयोग' लिहिले आहे. स्लिपमध्ये एकूण २२ हजार रुपये जमा असल्याचा उल्लेख आहे.




## काकडी तोडली, शिक्षा झाली

काकडीची चोरी करणं एका व्यक्तीला चांगलंच महागात पडलं आहे. काकडी चोरीच्या या आरोपीला ११ कोटी रूपयांचा दंड भरावा लागणार आहे. अमेरिकेतल्या एका न्यायालयाने ही शिक्षा सुनावली आहे. अर्थात ही साधीसुधी काकडी नव्हती तर समुद्री काकडी होती. एका कंपनीच्या मालकाने मोठ्या संख्येने या काकड्या काढल्या. सागरी संपत्ती गोळा करणारी त्याची कंपनी आहे. 'ओरिएंट सी फूड प्रोडक्शन्स' असं या कंपनीचं नाव आहे. या विचित्र घटनेला न्यायालयाने गांभीर्याने घेतलं. न्यायालयाने कंपनीला मालकाला तीन वर्षांची शिक्षा ठोठावली. इतकंच नाही तर अकरा कोटी रूपयांचा दंडही ठोठावला. पर्यावरण आणि समुद्री जीवनाचा विचार केला तर न्यायालयाचा निर्णय योग्य असल्याचं अमेरिकन नागरिकांचं म्हणणं आहे.



अमेरिकेत समुद्रातून काकडी काढणं बेकायदेशीर नाही. पण ही कृती करण्याआधी संबंधित प्रशासनाकडून परवानगी घेणं गरजेचं असतं. हून नामकुंग असं या कंपनीच्या मालकाचं नाव आहे. गरजेपेक्षा २० टक्के अधिक काकडी काढल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. २०१४ ते २०१६ या काळात हूनने समुद्रातून १,१३,४०० काकड्या काढल्या होत्या. यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता होती. समुद्री काकड्यांमुळे पाण्यातल्या क्षारांची संख्या संतुलित राहते. जास्त प्रमाणात काकड्या काढल्याने पाण्याचं संतुलन बिघडून समुद्री जीवन धोक्यात येऊ शकतं. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाचं सगळीकडून स्वागत होत आहे.

## 'इथे' हव्यात फक्त पांढऱ्या गाड्या

जगातील अनेक देश केवळ संस्कृती किंवा नैसर्गिक सौंदर्यासाठीच नव्हे, तर तिथल्या अनोख्या कायद्यांसाठीदेखील ओळखले जातात. प्रत्येक देशात नागरिकांना काही नियमांचे पालन करावे लागते, परंतु काही ठिकाणी नियम इतके वेगळे आहेत की ते ऐकून आश्चर्य वाटेल. एका देशातील रस्त्यांवर फक्त पांढऱ्या गाड्यांनाच परवानगी आहे.

या देशाची राजधानी पांढऱ्या संगमरवराचे शहर म्हणून ओळखली जाते. कारण येथील जवळजवळ प्रत्येक बांधकाम, इमारती, पदपथ, सरकारी कार्यालये सार्वजनिक जागांपर्यंत सगळे चमकदार पांढऱ्या संगमरवरापासून बनलेले आहे. या दगडांवर सूर्यप्रकाश पडतो तेव्हा संपूर्ण परिसर तेजस्वी दिसतो. दिवस असो वा संध्याकाळ, शहर तेजस्वी दिसते. या तेजस्वी देखाव्यामुळे ते जगातील सर्वात चैतन्यशील आणि अद्वितीय शहरांपैकी एक बनले आहे. पांढऱ्या संगमरवराच्या प्रचंड प्रमाणाने त्याची ओळख पूर्णपणे बदलली आहे. म्हणूनच या शहराने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये स्थान मिळवले आहे. २००० नंतर येथे मोठ्या प्रमाणात विकासकाम सुरू झाले. या पुनर्बांधणी मोहिमेत ५५० हून अधिक नवीन संगमरवरी इमारती बांधल्या गेल्या. या इमारतींमधून चालताना जणू संपूर्ण शहर एका विशिष्ट थीमभोवती बांधले गेले आहे, असे वाटते.

पांढरा दगड इतका तीव्रतेने चमकतो, की रहिवाशांना अनेकदा सनग्लासेस घालावे लागतात. मनोरंजक म्हणजे, ढगाळ हवामानदेखील चमक कमी करत नाही. हा अनोखा देश तुर्कमेनिस्तान आहे आणि त्याची राजधानी अश्गाबातमध्ये २०१८ मध्ये रस्त्यावर फक्त पांढऱ्या किंवा हलक्या रंगाच्या गाड्याच चालू शकतील, असा नियम लागू करण्यात आला होता. हा नियम तुर्कमेनिस्तानचे तत्कालीन राष्ट्रपती गुरबांगुली बर्दीमुहामेदोव्ह यांनी लागू केला होता. त्यांना पांढऱ्या रंगाची विशेष आवड होती. राष्ट्रपतींची ही वैयक्तिक पसंती हळूहळू शहरव्यापी नियम बनली आणि संपूर्ण राजधानीच्या देखाव्यावर त्याचा प्रभाव पडला.

कोणी काळी कार किंवा इतर कोणत्याही रंगाची कार खरेदी केली, तर ती चालवू शकत नाहीत. पोलिस ताबडतोब वाहन जप्त करतात आणि मालकाला मोठा दंड आकारतात. नियमांनुसार किंवा कायदेशीर औपचारिकता पूर्ण होईपर्यंत गाडी परत केली जात नाही. परिणामी, येथे फक्त पांढऱ्या आणि चांदीसारख्या हलक्या रंगांच्या गाड्या दिसतात. या नियमाने



शहर सुंदर बनवले आहे. या ठिकाणी रंगाचा नियम केवळ वाहनांपुरता मर्यादित नाही. शहराच्या डिझाइन, सजावट, सरकारी जाहिराती आणि सार्वजनिक कलेत समान पांढरे सौंदर्य आवश्यक आहे. अनेक देशांच्या वास्तुकलेत वेगवेगळ्या शैलींचे मिश्रण असले, तरी संपूर्ण अश्गाबात शहर एकाच थीमभोवती डिझाइन केले असल्याचे दिसते. त्याच्या सरकारी इमारती, मॉल, हॉटेल्स, उद्याने आणि त्यांच्या अंतर्गत सजावटीमध्येही पांढऱ्या रंगाला प्राधान्य दिले आहे.

या शहरातून फिरताना डोळ्यांना सर्वत्र पांढरा रंग दिसतो. म्हणूनच त्याचे सौंदर्य अद्वितीय वाटते. पर्यटक येथे केवळ भेट देण्यासाठीच नव्हे तर शहराच्या असाधारण वास्तुकला आणि अद्वितीय नियमांचे कौतुक करण्यासाठीदेखील येतात. तुर्कमेनिस्तानमधील हे पांढरे शहर जगाला दाखवून देते, की कायदे केवळ सुव्यवस्थेसाठी बनवले जात नाहीत. कधीकधी एखादा नियम त्या ठिकाणाची ओळख बनतो ....

## ग्रामस्थांनी चांदागड नाल्यावर बांधला बंधारा




**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** तालुक्यातील चांदागड येथील नाल्यावर वनराई बंधारा बांधण्यात आला असून, पाणी अडवा पाणी जिरवा,या उद्देशाने पाण्याच्या विहिरीला लागून वनराई बंधारा बाधण्यात आला. वनराई बंधाऱ्यामुळे सदर विहिरीतील पाण्याची पातळी वाढली असून चांदागड येथील गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली आहे. यामुळे गावकऱ्यांना आनंद व्यक्त होत आहे.

बंधारा बांधकाम करताना, विनोद माचलाम, गोमा कवडो, महेश कोडा, वाय.एस. राठोर, विस्तार अधिकारी प.स. कुरखेडा नेताजी प्रधान, विश्वनाथ गावळे, वाय.एस. बनसोड ग्रामसेवक, चांदागड येथील सरपंच हरिराम चुरगाये, मोरेश्वर पुराम, ज्ञानेश्वर पुराम, भजनराव धूरवे, पुरुषोततम माचलाम, जि.प. शाळा चांडागड येथील संच व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या

### नववर्षाच्या आदल्या रात्रीच्या घटनेने कुरखेडा तालुका हादरला




दै.युवाराष्ट्र दर्शन
**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि.३१ :** प्रेमप्रकरणात अडसर ठरणाऱ्या पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केल्याची खळबळजनक घटना कुरखेडा येथे मंगळवारी (दि.३०) मध्यरात्रीच्या सुमारास घडली. हत्येनंतर हा प्रकार अपघाताचा वाटावा म्हणून मृतदेह पुलाखाली फेकुन बनाव रचला, मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून हत्येचा उलगडा केला. देवानंद सूर्यभान डोंगरवार (३२), रा. गेवर्धा ता.कुरखेडा असे मृत पतीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीस व तिच्या प्रियकरास अटक केली आहे. नववर्षाच्या आदल्या रात्रीच ही घटना घडल्याने कुरखेडा तालुका हादरुन गेला आहे.

सविस्तर वृत्त असे की, कुरखेडा तालुक्यातील गेवर्धा येथील देवानंद डोंगरवार यांचा आंधळी येथील एका युवतीशी युवतीशी २०१८ मध्ये आंतरजातीय विवाह झाला. सुरुवातीला दोघांचाही संसार सुरळित सुरु होता. अशातच गेवर्धा येथील महामार्ग बांधकाम करणाऱ्या कंपनीत वाहनचालक म्हणून कार्यरत राजोली येथील युवकाशी ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर दोन महिन्यातच पत्नीने घर सोडले. ती पतीपासून विभक्त होऊन प्रियकरासोबत कुरखेडा येथे राहू लागली. यामुळे व्यथित देवानंदने पत्नीला परत येण्याची अनेकदा गळ घातली. सदर प्रकरण तंटामुक्त गाव समितीकडे गेले. परंतु पत्नी उपस्थित राहिली नाही. त्यामुळे विवाह बंधनातून मुक्त होण्याचा सल्ला तंमुस पदाधिकाऱ्यांनी दिला होता. मात्र देवानंदसोबत संसार करायचा नाही, मात्र आंतरजातीय विवाहासाठी शासनाकडून मिळालेले ५० हजार रुपये मिळाल्यशिवाय मी सोडचिठ्ठी देणार नाही, अशी अट पत्नीने घातली. त्यानंतरही देवानंद अधुनमधून तिला समजाविण्यासाठी कुरखेडात येत होता.

**रक्ताच्या खुणांनी हत्येचा कट उलगडा**

हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी देवानंदचा मृतदेह त्याच्याच दुचाकीवर बसवून सती नदीच्या पुलाजवळव नेला़ तिथे मृतदेह फेकून दुचाकीची तोडफोड केली, जेणेकरुन हा अपघात वाटावा. मात्र हत्येच्या ठिकाणापासून ते पुलापर्यंत रस्त्यावर पडलेल्या रक्ताच्या थेंबानी पोलिसांचा संशय बळकट केला. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवित काही तासातच दोन्ही आरोपींना जेरबंद केले़ पोलिस निरीक्षक महेंद्र वाघ यांच्या नेतृत्वात कुरखेडा पोलिसांनी अवघ्या तासाभरातच आरोपींना अटक केली.

अशातच मंगळवारी तो तिच्या घरी गेला. रात्री देवानंद, पत्नी व प्रियकर यांच्यात वाद झाला. वाद एवढा विकोपाला गेला की पत्नी आणि प्रियकर यांनी देवानंदच्या डोक्यावर जीवघेणा प्रहार केला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला़

घटनेची माहिती मिळताच मंगळवारी रात्री कुरखेडा पोलिसांनी घटनास्थळ गाठले. प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करीत अवघ्या काही तासातच हत्येचा उलगडा करीत कुरखेडा पोलिसांनी पत्नी व प्रियकरास खुनाच्या गुन्ह्यात अटक केली. पुढील तपास पोलिस निरीक्षक महेंद्र वाघ यांच्या नेतृत्वात सदर कारवाई पार पाडण्यात आली.

# गडचिरोलीतील विद्यार्थ्यांसाठी जागतिक ज्ञानाची दारे उघडणार



दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना जागतिक घडामोडींशी जोडण्यासाठी आणि त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना 'द हिंदू ग्रुप' ची विशेष शैक्षणिक पुस्तके आणि टॅब्लॉइड्स मोफत उपलब्ध करून दिली जाणार असून, या शैक्षणिक साहित्याचा संपूर्ण खर्च जिल्हा प्रशासनामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम व विशेष सहाय्य योजनेतून केला जाणार आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी कार्यालय व द हिंदू ग्रुप यांच्यामध्ये याबाबत सामंजस्य करार करण्यात आला.

ही विशेष प्रकाशने विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहेत. यामध्ये प्राथमिक विभागातील ५ ते १२ वयोगटातील मुलांसाठी 'द हिंदू यंग वर्ल्ड' हे साप्ताहिक दिले जाईल, ज्यात विज्ञान, इतिहास आणि रंजक खेळांचा समावेश असतो. तसेच, माध्यमिक विभागातील ११ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी 'द हिंदू इन स्कूल - संडे वीकेंडर' हे २१ पानांचे टॅब्लॉइड दिले जाणार आहे, ज्यामध्ये चालू घडामोडी, वैज्ञानिक शोध आणि विविध कोडी यांसारखा माहितीपूर्ण मजकूर असेल.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या उर्वरित कालावधीसाठी ही पुस्तके दर आठवड्याला थेट शाळांमध्ये पोहोचवली जाणार असून, या दर्जेदार शैक्षणिक साहित्यामुळे गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मोठी मदत होणार असल्याचे यावेळी सांगितले गेले.

## 'थर्टी फर्स्ट' चा जल्लोष करा, पण नशेत नको!



दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अवघा काही काळ उरला आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री पार्ट्यांचे नियोजन सुरु आहे. मात्र, या उत्साहाच्या भरात अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जाण्याची शक्यता असते. याच पार्श्वभूमीवर 'तरुणांनो दारूला नाही म्हणा', 'नूतन वर्षाचे स्वागत शुद्धीत राहून करा', असे आवाहन मुक्तीपथतर्फे केले जात आहे. यासाठी जिल्हाभरात बॅनर, बैठकांच्या माध्यमातून जाणीव जागृती सुरू आहे.

नवीन वर्षाच्या पार्टीत मित्रांचा दबावमुळे अनेक तरुण पहिल्यांदा दारूला स्पर्श करतात. मात्र, ही एक वेळची चटक पुढे जाऊन गंभीर व्यसनात रूपांतरित होऊ शकते. मद्यप्राशन करून वाहन चालवल्यामुळे होणारे अपघात

**तरुणांनो, दारूला म्हणा 'नाही'**

दरवर्षी अनेक कुटुंबांचे आनंद हिरावून घेतात. 'ड्रिंक अँड ड्राईव्ह'मुळे स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात येतो. पार्ट्यांमध्ये दारूऐवजी ज्यूस, मॉकटेल किंवा इतर आरोग्यदायी पेयांचा आनंद घ्या. गाणी, डान्स, खेळ आणि गप्पांच्या माध्यमातूनही नवीन वर्षाचे स्वागत उत्साहात करता येते. तरुणाई ही देशाचे भविष्य आहे. एका रात्रीच्या चुकीच्या निर्णयामुळे तुमचे भविष्य धूसर करू नका. यंदाच्या थर्टी फर्स्टला व्यसनमुक्त राहण्याचा संकल्प करा. असे आवाहन मुक्तीपथर्फे केले जात आहे.

## ४८६ दिव्यांगांनी घेतला शिबिराचा लाभ



दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** 'सर्च' आणि श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिती यांच्या वतीने शोधग्राम येथे आयोजित मोफत विकलांगता सहायता शिबिरात ४८६ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम पाय, हात, कॅलीपर, वॉकर, कुबड्या, व्हिल चेअर आणि श्रवण यंत्र मोफत वितरित करण्यात आले. २१ ते २४ डिसेंबर या कालावधीत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे हे दुसरे वर्ष आहे.

दिव्यांग व्यक्तींचे जीवन सुसह्य करणाऱ्या या उपकरणांची उपलब्धता थेट गडचिरोलीत व्हावी यासाठी 'सर्च' हे शिबिर आयोजित करते. त्यासाठी श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिती. ची टीम त्यांच्या सर्व उपकरणांसह शोधग्राममध्ये येते. दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून त्यांना आवश्यक ती उपकरणे त्याच दिवशी बनवून दिली जातात. यामध्ये २३० व्यक्तींना श्रवण यंत्रांचे वितरण झाले. तर गुडघ्याखालील पायासाठी जयपूर फूट ३० व्यक्तींना तर १८ व्यक्तींना गुडघ्यावरील जयपूर फूटचे वितरण करण्यात आले. शिवाय ३७ व्यक्तींना काठ्या, २८ व्यक्तींना व्हिलचेअर देण्यात आल्या आहेत.

२१ डिसेंबर रोजी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.आशिष कुबडे यांच्याहस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी 'सर्च' च्या संचालक डॉ.राणी बंग आणि श्री भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे पदाधिकारी नारायण व्यास यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी गरजु दिव्यांग मोठया संख्येने उपस्थित होते.

## उपराजधानीत चुडाराम बल्हारपुरे सन्मानित

### रानगर्भातील रानफुले या कवितेचे सादरीकरण



दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** संत्रानगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरच्या रेशीमबाग येथील महात्मा फुले शिक्षण संस्था सभागृहातील राम गणेश गडकरी विचारपीठ परिसरात कलागौरव संस्था व अक्षरक्रांती फाऊंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या दोन दिवशीय अक्षर साहित्य संमेलनातील कवी संमेलनाचे द्वितीय सत्रात झाडीपट्टीतील नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांना आमंत्रित कवी म्हणून पाचारण करण्यात आले होते.

त्यांनी या सत्रात रानगर्भातील रानफुले या गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कवितेचे सादरीकरण केले. उपस्थित कवी, साहित्यिक व रसिक प्रेक्षकांनी त्यांच्या कवितेला उत्स्फूर्त दाद दिली.

कवी संमेलनाध्यक्ष नेहा भांडारकर (प्रसिद्ध कवयित्री) यांचे हस्ते प्रमुख अतिथी लोकराम शेंडे, डॉ.स्मिता मेहेत्रे, डॉ.शोभा रोकडे (अमरावती), व मोहन सोमलकर, अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे, प्रभाकर तांडेकर इ. साहित्य व कवी यांचे उपस्थितीत चुडाराम बल्हारपुरे यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

चुडाराम बल्हारपुरे यांच्या या यशाबद्दल प्रा. अरुण बुरे, योगेश गोहणे, यादव गहाणे, प्रा.डॉ.श्याम मोहरकर व इतर साहित्यिक व कलावंतांनी अभिनंदन केले आहे.

## दि गडचिरोली नागरी सहकारी पतसंस्था आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानित



दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** विदर्भ क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज फेडरेशन लि. अमरावती तर्फे स्व. गोपाळरावजी राजूरकर स्मृती प्रित्यर्थ २०२४ - २५ या वर्षासाठी आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार वितरण सोहळा अमरावती येथील शुभम मंगलम बॅंक्वेट हॉल मध्ये २८ डिसेंबर रोजी श्रीमती सई डहाके आमदार कारंजा-मानोरा विधानसभा क्षेत्र यांच्या अध्यक्षतेखाली श्री जिजाबा पवार अध्यक्ष ज्ञानदिप क्रेडीट को-ऑप सोसायटी मुंबई, श्रीकांत दुबे सनदी लेखापाल व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या ताळेबंद (बॅलेन्स शिट) च्या विवीध बाबींच्या निकषावर आदर्श पतसंस्था पुरस्कार वितरीत करण्यात आले. नागरी सहकारी/ ग्रामीण बिगर शेती / महिला या गटात गडचिरोली जिल्ह्यातून दि गडचिरोली नागरी सहकारी पतसंस्थेला आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. संस्थेच्या मुख्य शाखेचे व्यवस्थापक भूषण रोहणकर रोखपाल विजय नवघरे, मंगेश तिवाडे, मनीष म्हशाखेत्री यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्विकारला.

संस्थेला मिळालेल्या सन्माना बददूल संस्थेचे अध्यक्ष अनिल पाटील म्हशाखेत्री, उपाध्यक्ष श्रीमती सुमतीताई मुनघाटे, मानद सचिव श्रीमती सुलोचना वाघारे, मुख्य व्यवस्थापक गजानन मादेश्वार, लिंगाजी मोरांडे व संचालक मंडळ यांनी सर्व कर्मचारी, ठेव संकलन अभिकर्ते, सभासद, ग्राहक, ठेवीदार यांचे अभिनंदन केले.

## विद्यार्थ्यांनी लुटला सहलीचा आनंद




दै.युवाराष्ट्र दर्शन
**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.३१ :** शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, चामोर्शी येथील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीत एकूण ८० विद्यार्थी तसेच ८ शिक्षक सहभागी झाले. सहल प्राचार्य डॉ. ए. आर. गौरकार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी नागपूर, कोराडी माता मंदिर, खिंडसी तलाव, रामटेक मंदिर, लाईट हाऊस वॉटर अँड अम्युझमेंट पार्क तसेच स्वामीनारायण मंदिर या ठिकाणी भेट दिली. या सहलीत विद्यार्थ्यांना धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन स्थळांची प्रत्यक्ष माहिती मिळाली तसेच मनोरंजन उद्यानातील विविध उपक्रमांचा आनंद लुटता आला. सहलीमध्ये शिक्षक पी. पी. भिसे, एस. एस. आडे, एच. एस. नेवारे, डी. एस. टेंभूर्णे, डी. डी. चंदनखेडे, एल. आर. यादव, बी. एम. पित्तुलवार आणि एल. व्ही. येरमे यांनी मार्गदर्शन केले. या सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सहकार्य, सामाजिक जाणीव आणि समूहकार्याची भावना विकसित झाली. सहल यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालक. चे सहकार्य लाभले.

## मतीमंद दिव्यांगांच्या पालकत्वासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** जिल्ह्यातील मतीमंद (बौद्धिक दिव्यांग) प्रवर्गातील १८ वर्षे व त्यावरील दिव्यांग व्यक्तींना कायदेशीर संरक्षण व सामाजिक सुरक्षितता मिळावी, या उद्देशाने नॅशनल ट्रस्ट अधिनियम, १९९९ अंतर्गत लोकल लेव्हल कमिटी (एल.एल.सी.) मार्फत कायदेशीर पालकत्व देण्याची प्रक्रिया राबविण्यात येते. मात्र, जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाकडे या योजनेसाठी अपेक्षित प्रमाणात अर्ज प्राप्त झाले नाही. त्यामुळे जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी मतीमंद प्रवर्गातील पात्र दिव्यांग व्यक्ती व त्यांच्या कुटुंबीयांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

## राजेंद्र राऊत यांचे निधन



**आरमोरी :** तालुक्यातील देलोडा येथील रहिवासी राजेन्द्र धोंडुबाजी राऊत यांचे दि.३० डिसेंबरला दुःखद निधन झाले. त्यांचेवर अंत्यविधी पार पडला. यावेळी गावकरी व नातेवाईक मोठया संख्येने उपस्थित होते.

## आयजीपींनी दिली तुमरकोटीला भेट

दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** सीआरपीएफच्या १९१ बटालियन व सिव्हिल पोलिसांच्या नव्याने उघडण्यात आलेल्या तुमरकोठी येथील कॅम्पला आयजीपी (डब्ल्यूएस) वीरेंद्र अग्रवाल यांनी गुरुवारी (दि. २५) भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत डीआयजी (ऑप्स) जीडीएल अजय कुमार शर्मा, १९१ बटालियनचे कमांडंट सत्यप्रकाश तसेच अन्य वरिष्ठ सीआरपीएफ अधिकारी उपस्थित होते. या भेटीदरम्यान कॅम्प परिसरात सिव्हिक ॲक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात आयजीपी अग्रवाल यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

सदर कार्यक्रमात सीआपीएफ १९१ बटालियनच्या वतीने परिसरातील नागरिकांना ब्लॅकेट, खुर्च्या आणि क्रीडा उपकरणे अशा विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास सीआरपीएफ जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांनी शासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी आयजीपी वीरेंद्र अग्रवाल यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

## -: अल्प मुदती निविदा सुचना :-

आदिवासी वन कामगार सहकारी संस्था मर्यादित फुलबोडी र.नं.२५३ या संस्थेच्या सभासदांना वितरण करण्याकरीता प्रत्येकी १.०० क्विंटल ५ फुट उंचीचे गेज १२ गेलोनाईज (लोखंडी/ तार जाळी) पुरवठा करण्यास इच्छुक पुरवठा धारकाकडुन कोटेशन मागविण्यात येत आहे. कोटेशन दिनांक ०७/०१/२०२६ ला दुपारी ०२.०० वाजेपर्यंत संस्थेत प्राप्त होतील अशा बेताने संस्थेचे कार्यालय चामोर्शी रोड गडचिरोली येथे पाठवावित. दिनांक ०७/०१/२०२६ चे ०२.०० वाजे नंतर प्राप्त होणाऱ्या कोटेशनचा विचार केल्या जाणार नाही.

(टिप :- शर्ती व अटी संस्थेच्या कार्यालयात पाहावयास मिळतील.)

**कार्यालयाचा पत्ता :** गडचिरोली जिल्हा जंगल कामगार सहकारी संघ मर्या. गडचिरोली गोकुल नगर चामोर्शी रोड गडचिरोली.

अध्यक्ष/सचिव
आदि. वन काम. सह.संस्था मर्या.
फुलबोडी र.नं. २५३

**कोर्ट वियमान तालुका दंडाधिकारी, चामोर्शी यांचे न्यायालय**

राजस्व प्रकरण क्रमांक/जन्म-मृत्यु/133
मौजा :- चामोर्शी
नगर पंचायत - चामोर्शी

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व जनतेला सुचित करण्यात येत आहे की, श्री.नरेंद्र बाबुराव बारसागडे रा. चामोर्शी, ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांना स्वतःचे नामे श्री.नरेंद्र बाबुराव बारसागडे ह्यांचा / हिचा जन्म नोंद करणे बाबतचे आदेश मिळणे करिता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक, आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नमुना 2025/(ई.आ.991181) प्र. क्र.22/कु.क.दिनांक 12 मार्च 2025 नुसार जन्म मृत्यु नोंदणी बाबतची कार्यपध्दती निश्चित करणे या अन्वये अर्ज दाखल करून नगर पंचायत चामोर्शी येथुन मृत्यु / जन्म नोंदीचा दाखला मिळण्यास अर्ज सादर केलेला आहे. त्यांनी दाखल केलेला आहे. त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार त्यांची जन्म तारीख 28/11/1991 जन्म स्थळ - चामोर्शी हे असुन नगर पंचायत चामोर्शी अंतर्गत येत असल्याचे नमुद केलेले आहे.

वरील प्रमाणे प्रकरणात चौकशीची कार्यवाही सुरू आहे. सदर बाबतीत कुणाचे काही उजर/तक्रार/आक्षेप असल्यास त्यांनी पुराव्यासहीत तहसिल कार्यालय चामोर्शी येथे आस्थापना शाखा (कक्ष क्रमांक 01 मध्ये दिनांक : 13/01/2026 चे पुर्वी लेखी स्वरूपात सादर करावे.) मुदतीनंतर प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप/अर्ज स्विकारण्यात येणार नाही. व प्रकरणात निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक :- 30/12/2025
ठिकाण :- चामोर्शी

स्वा/-
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी चामोर्शी

# संत तुकाराम महाराज यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरा करा

### कुणबी समाज सेवा समितीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



दै.युवाराष्ट्र दर्शन
**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.३१ :** संत श्रेष्ठ जगतगुरू तुकाराम महाराज यांची जयंती ज्याप्रमाणे इतर थोर राष्ट्रपुरूष व संतांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी केली जाते. त्याच धर्तीवर संत तुकाराम महाराज यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनातून कुणबी समाज सेवा समितीच्यावतीने करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनानुसार, राज्य शासनाने २०२६ या वर्षात भारतातील तसेच राज्यातील थोर राष्ट्रपुरूष व थोर व्यक्ती यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी करण्यात यावे, यासंदर्भात परिपत्रक जाहीर केले आहे. या परिपत्रकात कुणबी समाजाचे आराध्य दैवत संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीचा कुठेही उल्लेख नाही. विशेष बाब म्हणजे राज्यातील अनेक थोर पुरूषांचे संत तुकाराम महाराज हे गुरूस्थानी होते. तरीही त्यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरी केली जात नसल्याने समाज बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे शासनाने संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज यांची जयंती राष्ट्रीय दिन म्हणून साजरा करण्यासाठी सदर परिपत्रकात समाविष्ट करावे, अशी विनंती निवेदनातून केली आहे.

सदर मागणीचे निवेदन निवासी जिल्हाधिकाऱ्यांना सोपविण्यात आले. यावेळी कुणबी समाज सेवा समितीचे पी.व्ही. राऊत, पी.पी. भागडकर, पुरूषोत्तम ठाकरे, नगरसेवक रमेश चौधरी, एम. आर. हारगुडे, एम. डी. कामडी, आशिष ब्राम्हणवाडे, प्रभाकर कुबडे, श्रीकृष्ण अर्जुनकर, वासुदेव बट्टे, नंदू वाईकर, अनिकेत राऊत, चेतन गोहणे आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत खेळाचे अनन्यसाधारण महत्व




E-mail : yuvarashtradarshan.com

देशामध्ये पालकांची खेळाप्रती असलेली उदासीनता आणि पाल्यांना मिळणारे अपुरे प्रोत्साहन अशा सामाजिक पार्श्वभूमीवर हॉकी या खेळाविषयी गोडी निर्माण करून त्याच्या प्रचार व प्रसारात मोठे योगदान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय पातळीवर हॉकी स्पर्धेत तीन वेळा सहभागी झालेले क्रीडा शिक्षक सचिन कांबळे यांनी केले आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात शेकडो खेळाडूंना राज्य पातळीवर, देश पातळीवर खेळविले आहे, त्यांना यश संपादन करून दिले आहे. आज राज्यातल्या टॉप असणाऱ्या दहा क्रीडा शिक्षकांमध्ये कांबळे सर यांचे अव्वल स्थान आहे.

वडील पोलिस खात्यात असल्याने चार ऑलिंपिक आणि चार विश्वचषक जिंकलेले धनराज पिल्ले जिथून घडले, अशा पुण्यातील खडकी या गावाशी त्यांचा संपर्क आला. हॉकीचे माहेरघर असलेल्या या गावात अनेक हॉकी खेळाडू घडत होते. या पोषक वातावरणाचा सचिन कांबळे यांच्यावर प्रभाव पडला आणि त्यांच्यात या खेळाविषयी आकर्षण निर्माण झाले. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षीच त्यांनी या खेळात आयुष्य घडविण्याचे ठरविले. भारतीय संघात खेळण्याचे स्वप्न बाळगून सचिन यांनी या खेळासाठी आवश्यक सर्व नैपुण्य आत्मसात करत कठोर मेहनत घेत १८ वर्षांखालील पुणे विद्यापीठाची देशपातळीवरील पहिली स्पर्धा जिंकली. अशा तऱ्हेने त्यांच्या कारकिर्दीची यशस्वी घोडदौड सुरू झाली.

मात्र हा प्रवास सुरू करताना आलेला एक कटू अनुभव ते सांगतात. १४ वर्षांखालील बेंगळुरू नॅशनल हॉकी स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली होती. त्यासाठी ते रोज ४ ते ५ किलोमीटर धावायचे. खेळाचा आवश्यक अभ्यास करून त्यांनी कौशल्य प्राप्त केले होते. पण ऐनवेळी राजकीय दबावातून त्यांचे नाव रद्द करण्यात आले. ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली. त्यांच्या आईनेही खेळ सोडून अभ्यासाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला. मात्र या खेळालाच वाहून घेण्याचा त्यांचा निर्णय ठाम होता. आज १६ ते १७ वर्षांपासून ते क्रीडा क्षेत्रात कार्यरत असून आपल्या कारकिर्दीत ते राष्ट्रीय पातळीवर तीन वेळा, तर विद्यापीठ स्पर्धांमध्ये दोन वेळा सहभागी झाले आहेत. हॉकी महाराष्ट्र असोसिएशनमध्ये त्यांनी राष्ट्रीय पंच म्हणून बारा वर्षे सेवा दिली असून सातारा जिल्हा क्रीडा विभागातही त्यांचा सहभाग आहे.

खेळासाठी संघर्ष करत असताना खेळाडूंची परिस्थिती त्यांनी जवळून अनुभवली होती. विद्यार्थ्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, याची त्यांना जाणीव होती. यातूनच उदयन्मुख खेळाडूंसाठी आपले काही देणे लागते, या प्रेरणेतून आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी बी.पी.एड. पूर्ण केले. पुण्यातील सैनिक शाळेपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास अखंडपणे पाचगणी येथील संजीवन विद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून सुरू आहे.

संजीवन विद्यालय ट्रस्टच्या अध्यक्ष शालिनीताई या आज वयाच्या ९३ व्या वर्षीही अपार उत्साहाने या संस्थेच्या अध्यक्षपदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि प्रोत्साहनातून शाळेच्या निसर्गरम्य २२ एकर कॅम्पसमध्ये आठ एकर फुटबॉल व हॉकी मैदान, ४०० मीटर अथलेटिक्स ट्रॅक, ६०० मीटर नैसर्गिक ट्रेक, २५ मीटर स्विमिंग पूल, क्रिकेट मैदान, नेट प्रॅक्टिस क्षेत्र, जिम, बास्केटबॉल आर्टिफिशियल कोर्ट, चारशे लोकांसाठी क्रीडा वसतिगृह अशी सुसज्ज आणि पोषक क्रीडा सुविधा उभारण्यात आली आहे. आपल्या



शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध शिकवणुकीतून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नैपुण्यसमृद्धता निर्माण केली असून जिंकण्याची मनोवृत्ती रुजवली आहे. त्यांच्या या समर्पणातून १६ ते २० खेळाडू राष्ट्रीय पातळीवर व ३०० ते ३५० विद्यार्थी राज्य पातळीवर खेळले आहेत. अक्षय कुमारच्या 'गोल्ड' चित्रपटात त्यांचे दोन विद्यार्थी झळकल्याची गोष्ट ते अभिमानाने सांगतात. खेळात आवड असलेल्या ३५ ते ४० वयोगटातील ज्येष्ठ क्रीडाप्रेमींसाठी ते स्पर्धांचे आयोजन करतात. विभागीय, राज्य आणि शासनस्तरीय स्पर्धांमध्ये ते पंच म्हणूनही कार्य करतात. त्यांच्या या मेहनतीची पावती म्हणून २००८ साली त्यांना लोकसेवा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००५ साली ऑल इंडिया विद्यापीठ हॉकी स्पर्धा आणि २००४ साली कुमार गट राष्ट्रीय स्पर्धा त्यांनी जिंकल्या आहेत. एनसीसी अधिकारी म्हणूनही ते कार्यरत आहेत.

सचिन सर यांनी देशभरात शेकडो विद्यार्थी घडवले आहेत, ते खेळासोबत सर्वांनी प्रेमाने नाते जोडावे असे सांगितले आहे.

सचिन सर ते म्हणतात, खेळाविषयी पालकांमध्ये असलेली उदासीनता आता कमी होत आहे. शासन पातळीवर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये थेट नियुक्ती मिळत आहे. ते अंतःकरणातून सांगतात की प्रत्येक खेळाडूचा पहिला गुरु हा त्याच्या शाळेतील क्रीडा शिक्षक असतो. या क्रीडा शिक्षकाने मिळणाऱ्या पगाराच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमधील खेळ कौशल्य ओळखून त्याला घडविण्यासाठी अपार मेहनत घेतली पाहिजे. खेळामध्ये शारीरिक सुदृढतेसोबतच मजबूत मानसिकता निर्माण करण्याची गरज आहे. कारण येथे मिळणारे यश सहज नसते. अपयश आले तरी खेळ संपत नाही आणि आयुष्य थांबत नाही, हे विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून आत्महत्येसारख्या विचारांपासून त्यांना परावृत्त केले पाहिजे. आज खेळाला चांगले दिवस आले असले तरी खेळ संघटना आणि होतकरू विद्यार्थ्यांना सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळण्याची गरज आहे. देश व राज्य पातळीवर खेळण्यासाठी तयार असलेल्या विद्यार्थ्यांना त्या त्या मैदानांशी जुळवून घेण्यासाठी दीड ते दोन महिने निवासी सरावाची सुविधा द्यायला हवी. गल्लीबोळीत खेळला जाणारा क्रिकेट जसा सर्वांना उमगला, तसाच हॉकी खेळ गाव पातळीवर पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये मैदाने तयार झाली पाहिजेत. ज्या खेळामुळे मला अर्थसहाय्य मिळाले आणि आज माझे घर चालते, त्या खेळाप्रती कृतज्ञता व्यक्त करत ते सांगतात की लवकर निवृत्ती घेऊन होतकरू विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ कार्य करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाची महत्त्वाची भूमिका असून खेळामुळे त्यांच्यात जिद्द, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती निर्माण होते. त्यामुळे पालकांनी अभ्याससोबतच खेळालाही महत्त्व द्यावे, असे आवाहन सचिन सर यांनी केले आहे. त्यांचा खेळाडू घडविण्याचा हा प्रवास असाच अखंडपणे सुरू राहो, यासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**सचिन कांबळे, क्रीडा प्रशिक्षक**
**भ्रमणध्वनी : ९८६०१६४०६६**

---

महाराष्ट्र शासन

## कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
## बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर

ई मेल :-constdivnagpur.ee@mahapwd.gov.in (दूरध्वनी क्र. ०७१२-२५६२९७६)

### ई - निविदा सुचना क्रमांक ५२ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) बांधकाम संकुल सिव्हील लाईन्स, नागपूर (महाराष्ट्र बांधकाम खात्याकडून) खालील कामांकरीता निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करणार नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बी-१ प्रपत्र नमुन्यातील निविदा (Percentage Rate) ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | Improvement to NH-7 to Bothiya Palora Hiwara Pathrai Road (VR) km 5/500 to 6/500 Tal. Ramtek Dist.Nagpur | Rs.42.00 Lakhs |
| २ | Improvement to Khanora to Tuyyapar Road (VR 50) Tal. Ramtek Dist.Nagpur | Rs.42.00 Lakhs |
| अ. | ई-निविदा उपलब्ध कालावधी :- **As per e-tender schedule uploaded on e-portal http://mahatenders.gov.in** ई-निविदा उघडणे: - (ऑनलाईन नमूद केलेले वेळापत्रक लागू व अंतिम राहील.) | |

१) **https://mahatenders.gov.in** सूचना फलकावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदली होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर कार्यालयातील सूचना फलक
३) पत्रव्यवहाराकरीता संपर्क व पत्ता: उपरोक्त नमूद केलेल्या ई-मेल किंवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
४) वरील निविदा डाऊनलोडच्या तारखेला ७२ तासात निविदाची तसेच लिफाफा १ मध्ये दस्ताएवजाची प्रत या विभागात सादर करण्यात यावी.

जावक क्रमांक ७८९१/ निविदा लिपीक/दि २९/१२/२०२५

(पराग ठमके)
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प)
नागपूर

क्र. संमावज/नाग/७९५/२०२५

---

## जगातील नंबर १ हेल्मेट निर्माता स्टीलबर्ड हेल्मेट्स -२०२६ मध्ये ऐतिहासिक हॅटट्रिकसाठी सज्ज

**नवी दिल्ली, ३१ :** स्टीलबर्डने एकदा पुन्हा भारत आणि जगभरातील राइडर्सचा विश्वास जिंकला आहे. २०२४ आणि २०२५ मध्ये जगातील नंबर १ हेल्मेट उत्पादक बनल्यानंतर, स्टीलबर्ड हाय-टेक इंडिया लिमिटेड आता २०२६ मध्ये ऐतिहासिक हॅटट्रिक पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे. या वर्षी कंपनीने ९.३ दशलक्ष हेल्मेट्स विकले आहेत. गेल्या वर्षी, जानेवारी २०२५ मध्ये, स्टीलबर्डला नवी दिल्ली मध्ये अधिकृतपणे जगातील आघाडीचा हेल्मेट निर्माता म्हणून घोषित करण्यात आले होते, त्या वेळी कंपनीने रेकॉर्ड ८.७५ दशलक्ष हेल्मेट्स विकले होते.

या मोठ्या आकडेवारीच्या मागे एक मोठा उद्देश दडलेला आहे - रस्त्यांवरील असंख्य जीव वाचवण्याचा संकल्प.

## निधन वार्ता



**संकल्प वाटकर**
**नागपूर, दि. ३१** पॅंथोन सोसायटी, मनिषनगर निवासी संकल्प रवींद्र वाटकर यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय २६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे. सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार पार पडला.







































































संकलन :- यशवंतराव शेंडे, तालुका प्रतिनिधी सालेकसा, सालेकसा, मो. ७०५७९३३४५३,

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिषप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिषप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१